जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAR 2018
महाराष्ट्र टाईम्स

## ऋद्धी जगताप प्रथम



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये सूक्ष्मजीवशास्त्र या विषयात ऋद्धी राजेंद्र जगतापने प्रथम क्रमांक पटकावला. तिला निर्मला केळवकर शिष्यवृत्ती मिळाली आहे. नुकत्याच शिवाजी विद्यापीठ पदवीदान समारंभात इस्रोचे माजी अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांच्या हस्ते तिला गौरविण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 MAR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील धरणे आंदोलन मागे

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात मागील सहा दिवसांपासून सुरू असलेले धरणे आंदोलन शनिवारी आमदार सतेज पाटील यांच्या आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. बबलू कराळेकर हा तरुण पात्र असतानाही त्याला विद्यापीठ प्रशासनाने नोकरीसाठी डावलल्याचा आरोप करत १९ मार्चपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू होते.

आंदोलनात कराळेकर कुटुंबीयांसह जनता दलाचे शिवाजीराव परुळेकर यांनीही सहभाग घेतला होता. आज सकाळी अकराच्या सुमारास आ. पाटील यांनी आंदोलकांची भेट घेतली. यावेळी कराळेकर यांचा प्रश्न शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्यासमोर मांडून न्याय देण्याची मागणी करण्याचे आश्वासन आ. पाटील यांनी दिले. यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी सुरेश कराळेकर, लैला कराळेकर, धारासिंग रजपूत, संगीता तामशीकर आदी उपस्थित होते.